पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ८
**सभावृत्तांत**

दिनांक : १७ / ०८ / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक १७ / ०८ / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. पहलानी गुरुबक्ष किशनदास
३) मा. ननवरे जितेंद्र बाबा
४) मा. सुपे आशा रविंद्र
५) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. नेटके सुमन राजेंद्र
८) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा. भंडारे - प्र.उपनगरसचिव, हे अधिकारी उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. सुमन नेटके

शुक्रवार दिनांक १७/०८/२०१२ दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती - शुक्रवार दिनांक १७/०८/२०१२ दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ८

**सभावृत्तांत**

( दिनांक १७/०८/२०१२ दुपारी ३.०० ची तहकूब सभा )

दिनांक : १७ / ०८ / २०१२ वेळ : दुपारी ४ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक १७/०८/२०१२ दुपारी ३.०० ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक १७ / ०८ / २०१२ रोजी दुपारी ४:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. नेटके सुमन राजेंद्र

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.माछरे - विशेष अधिकारी, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. .नितीन लांडगे

केंद्रीय विज्ञान व तंत्र विज्ञान मंत्री व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून शुक्रवार दिनांक ३१/०८/२०१२ दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

----------

**मा. सभापती** - शुक्रवार दिनांक ३१/०८/२०१२ रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **प्रसाद शेट्टी** )
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ८

**सभावृत्तांत**

( दिनांक १७/०८/२०१२ (दु. ३.०० व दु.४.००) ची तहकूब सभा )

दिनांक : ३१ / ०८ / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक १७/०८/२०१२ दुपारी ४.०० ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ३१ / ०८ / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.माछरे - विशेष अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

दिनांक ०३/०८/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :- ४९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ३१/०८/२०१२ विभाग :- क्रिडा
सुचक : मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रिडा/६/कावि/६५७/२०१२, दि.२५/०७/१२
२) मा. क्रिडा समिती सभा दिनांक ०१/०८/२०१२ ठराव क्रमांक १७

मनपाचे संत ज्ञानेश्वर क्रिडा संकूल, इंद्रायणी नगर, भोसरी येथील ॲथलेटिक्स ट्रॅक, हा ॲथलेटिक्स सराव व स्पर्धेसाठी व स्पर्धेसाठी भाडयाने देणेबाबत व प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे अटी व शर्ती व भाडे दर निश्चित करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- ५०
दिनांक :- ३१/०८/२०१२
सुचक : मा. आशा सुपे

विषय क्रमांक :- २
विभाग :- प्रशासन
अनुमोदक :- मा.शैलजा शितोळे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/७५८/२०१२, दि.०७/०८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री. सतिश कुलकर्णी, मुख्याधिकारी गट - अ यांची सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.जितेंद्र ननवरे

अनुमोदक :- मा.नितीन लांडगे

मनपाचे माजी नगरसेवक विजय जाधव व मनपाचे माजी उद्यान अधिक्षक शांताराम भोंडवे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी,

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ११३८ /२०१२
दिनांक - ३१ / ०८ / २०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.